PARLE **MAHOTSAV**

Organiser - **ADV. PARAG ALAVANI,** President, Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahostav.com

PARLE MAHOTSAV

<u>कृपया प्रसिध्दीसाठी</u>

# महिलांच्या सुरक्षततेच्या प्रतिज्ञेने १३ व्या पार्ले महोत्सवाचे उद्घाटन

मुंबई दि.२३: मुली तसेच महिलांवरील छेडछाडीच्या व हल्ल्यांसारख्या घटना घडत असल्यास त्याचा प्रतिकार करु अशी प्रतिज्ञा घेत १३ व्या पार्ले महोत्सवाचे उद्घाटन झाले. शालेय पाठ्यपुस्तकाच्या पहिल्या पानावर असलेल्या "सर्व भारतीय माझे बाधंव आहेत" ही प्रतिज्ञा सदैव स्मरणात ठेवून महिलांविषयी कृत्यकर्म कधीही करणार नाही अशीही प्रतिज्ञा यावेळी घेण्यात आली. महोत्सवाच्या सुरवातीस झालेल्या मॅरेथॉन शर्यतीच्या निमित्ते 'महिला सुरक्षा दौड' काढण्यात आली होती. यामध्ये विलेपार्ल्यामधील सर्व प्रमुख शाळांमधील सुमारे १ हजार विद्यार्थ्यांनी भाग घेतला तर मॅरेथॉन शर्यतीमध्येही सुमारे ३ हजार धावपटुंनी भाग घेतला. यावेळी सहाय्यक पोलीस आयुक्त , श्री.वसंत ढोबळे यांनी उपस्थितांना सदर प्रतिज्ञा दिली तर प्रसिध्द सिने अभिनेते श्री.मनोज जोशी, श्री.दिलीप जोशी, भारतीय महिला क्रिकेट टिमच्या श्रीमती अंजली पेंडारकर, साठ्ये महाविद्यालयाचे उप प्राचार्य श्री.माधव राजवाडे, श्री.विमलजी केडिया, प्रमुख आयोजक ॲड. पराग अळवणी व नगरसेविका सौ. ज्योती अळवणी या दौडमध्ये उपस्थित होते.

महिलांवरील अत्याचाराच्या विरोधात जनजागृती करण्याच्या दृष्टीने पार्ले महोत्सवामधील विविध स्पर्धांमध्ये 'महिला सुरक्षा' हा विषय मांडण्यात येणार आहे. याचाच एक भाग म्हणून पार्ल्यातील विविध रस्त्यांवर 'महिला सुरक्षा दौड' काढण्यात आली. या वेळी सहभागी झालेल्या मुलामुलींनी, "एक दोन तीन चार, अब न सहेंगे अत्याचार, हम भारत की नारी है, फुल नही चिंगारी है!" इत्यादी घोषणा देऊन विलेपार्ले परीसर दुमदुमुन सोडले. यावेळी सर्वोकृष्ट घोषणांसाठीच्या स्पर्धेत छत्रपती शिवाजी विद्यालय, पार्ले टिळक विद्यालय, एन.पी.के.टी हायस्कूल, माधवराव भागवत हायस्कूल, जी.एम्.इ.एस्. हायस्कूल शाळांना बक्षिसे मिळाली.

महोत्सवाच्या पहिल्या दिवशी मॅरेथॉन, फुटबॉल, कबड्डी, वॉलीबॉल, रस्सीखेच, ५० मिटर धावणे, शॉर्ट-पुट, गायन, जेष्ठनागरिक स्पर्धा, महिलासांठी होम मिनीस्टर स्पर्धा घेण्यात आल्या. यावेळी केवळ ४ वर्षीय बालकांपासून ते ८६ वर्षीय जेष्ठ नागरिकांनी भाग घेतला. सर्वच स्पर्धांमध्ये स्पर्धाकांचा उत्साह तसेच स्पर्धेसाठीची तयारी नजरेत येत होती. मॅरैथॉनमध्ये १२ विविध वयोगटांमध्ये तर गायन स्पर्धेतही ९ वयोगटांमध्ये स्पर्धा घेतल्याने स्पर्धकांना अधिकाधिक बक्षिसे मिळण्याची संधी मिळाली. दैनंदिन कामाच्या धकाधकीतून थोडा विरंगुळा मिळण्यासाठी घेतलेल्या. होम मिनीस्टर स्पर्धेत सुमारे ३०० महिलांनी उस्फूर्तपणे सहभाग घेतला. तर आपल्या लहानपणचे दिवस पुन्हा जागवत २०० जेष्ठ नागरिकांनीही जेष्ठ नागरिक स्पर्धेचा आनंद लुटला. एकुणच पहिल्या दिवशी सुमारे ७ हजार स्पर्धकांनी भाग घेतला तर सुमारे २५० बक्षिसे बहाल करण्यात आली. पार्ले महोत्सवा संदर्भात अधिक माहिती www.parlemahotsav.com या संकेत स्थळावर मिळेल.

———————————————————————————————————

सदर पत्रक श्री.चरणजीत सिंग संधू, सहआयोजक पार्ले महोत्सव यांनी प्रसिध्द केले आहे.